# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०५/०५/२०१८

**IPL मॅचवर सट्टा लावणारे आंतरराज्यीय टोळीस स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने घेतले ताब्यात ०४ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत**

---

छत्तीसगड राज्यातील बिलासपुर येथे आय.पी.एल. मॅचवर सट्टा लावणारे ०७ फरार इसम नाशिक व शिर्डी परिसरात येणार असल्याची माहिती बिलासपुर पोलीसांनी नाशिक ग्रामीण पोलीसांना दिली होती. त्यानुसार नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने नाशिकरोड रेल्वेस्टेशन येथुन छत्तीसगड राज्यातील बिलासपुर येथील ०७ इसमांना गितांजली एक्सप्रेसमधुन ताब्यात घेतले.

छत्तीसगड राज्यातील बिलासपुर शहरात आय.पी.एल. मालिकेदरम्यान होणा-या विविध संघांच्या सामन्यांवर लोकांकडुन पैशांची बोली लावुन सट्टा खेळणारे व खेळविणारे ०७ जुगारी इसमांवर बिलासपुर पोलीसांनी जुगारबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल केले होते. सदर गुन्हयांतील आरोपी हे छत्तीसगड राज्यातुन फरार झाले होते. दरम्यान दिनांक ०४/०५/२०१८ रोजी बिलासपुर पोलीसांनी नाशिक ग्रामीण पोलीसांना कळविलेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सदर फरार इसमांना नाशिकरोड रेल्वेस्टेशन येथुन गितांजली एक्सप्रेसमधुन ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसम नामे **१) किसनचंद गोधुमल बजाज**, रा.बिलासपुर, राज्य छत्तीसगड, **२) नारायणदास माधवदास नागवाणी**, रा.रायपुर, राज्य छत्तीसगड, **३) शिवकुमार छेदीलाल साहु**, रा. बिलासपुर, राज्य छत्तीसगड, **४) संजयकुमार मुरलीधर कृष्णानी,** रा. बस्तर, राज्य छत्तीसगड, **५) मुरली अशोक लोकवाणी**, रा. बिलासपुर, राज्य छत्तीसगड, **६) विजयकुमार नारायणदास बजाज**, रा.बिलासपुर, राज्य छत्तीसगड, **७) आकाश प्रभात शर्मा**, रा. बिलासपुर राज्य छत्तीसगड यांचे कब्जातील बॅगस्‌ची तपासणी व अंगझडती घेतली असता विविध महागडया कंपन्यांचे **२५ मोबाईल स्मार्टफोन, डेल कंपनीचा लॅपटॉप, पेनड्राईव्ह** तसेच आय.पी.एल. बेटींगसाठी लावण्यात आलेले अंक आकडे लिहिलेल्या डाय-या असा **एकुण ०४ लाख ५० रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आलेला आहे.

वरील ताब्यात घेतलेले आरोपीतांविरूध्द छत्तीसगड राज्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये आय.पी.एल. मॅचवर सट्टा लावल्याप्रकरणी गुन्हे दाखल असुन ते सराईत आहे. बिलासपुर पोलीसांनी सदर आरोपीतांना शोधुन देण्यासाठी १०,००० रूपयांचे बक्षीस जाहिर केले होते. गेल्या काही दिवसांपासुन ते फरार होते, दरम्यान सदर गुन्हेगार हे नाशिक येथे येणार असल्याची बातमी मिळालेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने नाशिकरोड रेल्वेस्टेशन परिसरातुन सदर गुन्हेगारांना ताब्यात घेतले आहे. नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सपोनि श्री. आशिष आडसुळ, सपोउनि नवनाथ गुरूळे, रविंद्र शिलावट, पोहवा शिवाजी जुंदरे, बंडु ठाकरे, पोना प्रितम लोखंडे, अमोल घुगे, पोकॉ संदिप हांडगे, संदिप लगड, चापोना रमेश काकडे अशांचे पथकाने सदर आरोपीतांना ताब्यात घेतले असुन आज रोजी त्यांना बिलासपुर पोलीस ठाणे, राज्य छत्तीसगड यांचे ताब्यात देण्यात आले आहे.